लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, वरळी पोलीस कॅम्प, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई-४०० ०३०.
**E-mail:** srosacb-ms@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. २४९२११२१२.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

क्र.लाप्रवि/आस्था-३/बाह्ययंत्रणा अंशकालीन सफाईगार/जाहिरात/२०२६-/०५ दि.०१/०१/२०२६.

..... ०० दरपत्रकाबाबतच्या सुचना ०० .....

विषय :- शासन निर्णय, वित्त विभाग, पदनि-२०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क./दि.२७/०४/२०२२ अन्वये लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुख्यालय, म.राज्य, मुंबई कार्यालयात तातडीने ०३ सफाईगार यांची बाह्ययंत्रणेव्दारे तातपुरत्या स्वरुपात सफाईगार भरणेबाबत.

.... ००० ....

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई मुख्यालय या कार्यालयात शासन निर्णय, वित्त विभाग, पदनि-२०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क./दि.२७/०४/२०२२ अन्वये बाह्ययंत्रणेव्दारे तातडीने ०३ सफाईगार यांची तात्पुरत्या स्वरुपात सफाईगार (अकुशल पदे) भरणेबाबत.

..... ०० अटी व शर्ती ०० .....

१. सीलबंध दरपत्रके दिनांक १२/०१/२०२६ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये सायंकाळी ११.०० वा. पर्यंत कार्यालयात जमा करावी. मुदतीनंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. मोहोरबंध प्रत्येकी ०३ लिफाप्यांवर (सफाईगार) भरणेबाबत दरपत्रक असे लिहिणे आवश्यक आहे. एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल.

३. दरपत्रक फॉर्मवर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

४. दरपत्रक मोहोरबंध लिफाफे उघडतेवेळी दरपत्रक धारक स्वत: किंवा त्याचा एक प्रतिधिधी स्वखर्चाने उपस्थित राहू शकतो.

५. दरपत्रक कागदपत्रात कुठेही खाडाखोड /ओव्हरराईटिंग (गिरवणे) पांढरी शाई लावणे टाळावे, चुकुन तसे करावे लागल्यास त्यावर पूर्ण स्वाक्षरी करावी.

६. कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार, हे कार्यालय राखून ठेवत आहे.

७. दरपत्रके दिनांक १३/०१/२०२६ सकाळी ११.०० वाजता अपर पोलीस अधीक्षक-मुख्या.-०२ यांचे दालनात उघडण्यात येतील.

८. दरपत्रके स्वीकारण्याबाबतचा अंतिम निर्णय या कार्यालयाचे विभाग प्रमुख यांचा राहील.

९. दरपत्रक स्वीकृती तारखेपासून कंपान्यांना सफाईगार पुरवठा करण्याबाबत पुढील अटी व शर्तीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. सफाई कामगार यांची कार्यालयात सुविधा पुरविण्याबाबत वेळ किमान ५ तास असेल. सकाळी ८ ते दुपारी १ व असे ०२ सफाईगार व दुपारी १ ते सायं ६ वाजेपर्यंत असा ०१ सफाईगार असेल.

२. सफाई कामगारांना एखाद्या कामासाठी बोलावल्यास त्याने वेळेत तत्पर राहुन सफाईबाबतची जबाबदारी घेणे बंधनकारक आहे.

३. एखादा सफाई कामगार काही कारणास्तव कार्यालयात गैरहजर राहिल्यास त्याच्या बदली कंपनीने दुस-या सफाई कामगाराची व्यवस्था तातडीने करण्यात यावी.

४. शा.नि. दि. २७/०४/२०२२ अन्वये अकुशल पदांची कामे बाहययंत्रनेकडून करुन घेण्याकरीता प्राप्त पुरवठादारांपैकी ज्यांचे दर सर्वात कमी असतील त्यानांच शासणाच्या सर्व अटी व शर्ती नुसार पुरवठादारास प्राधान्य दिले जाईल.

५. नियमानुसार सफाईगार कामगार साहित्यासकट पुरविण्याबाबत बंधनकारक आहे.

६. सदर कामगारांना कामगार आयुक्त निर्देशाप्रमाणे नियमानुसार वेतन अदा करण्याबाबत दरपत्रकात स्पष्ट नमुद करण्यात यावे.

७. सेवादर व जीएसटी याबाबत स्पष्टपणे नमुद करण्यात यावे.

अपाधी ५/०१/२०२६

( अरुण पाटील )
अपर पोलीस अधीक्षक (मुख्या.-०२)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

सर्व इच्छुक कंपन्या.